© October 2024 | IJIRT | Volume 11 Issue 5 | ISSN: 2349-6002

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० आणि आव्हाणे

सहा. प्रा. नासीर कासम शेख
*(राज्यशास्त्र विभाग प्रमुख), श्री विठ्ठल रुख्मिणी महाविद्यालय, सवना, ता. महागांव जि. यवतमाळ*

***Abstract—*** ***प्रसिध्द वैज्ञानिक डॉ. के. कस्तुरीरंगण यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या ११ सदस्यीय समितीने २०१८ च्या देशाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाला शिक्षणाचा नविन धोरणाचा मसुदा सादर केला. तेव्हा पासुन आजवर या मसुदयावर देशभर वेगवेगळ्या स्तरातून अनेक चर्चा घडल्या आहेत. अनेकांनी आपली मते देखील मंत्रालयाला कळविली आहेत. त्यानंतर २९ जुलै २०२० या दिवशी देशाच्या केंद्रीय मंत्रीमंडळाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ला मंजूरी दिली स्वातंत्र्यानंतर तीन दशकांनी १९८६ मध्ये प्रथम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले. १९९२ मध्ये त्यामध्ये काही सूधारणा करण्यात आल्या. ३४ वर्षांनंतर आधीच्या धोरणांचा फेर आढावा घेऊन आपण नविन धोरणाचा स्विकार केला. पूर्व प्राथमिक स्तरापासून आणि त्या पुढील शिक्षणाचा एकत्रित विचार करुन प्राचीन भारतीय विचार परंपराची सांगड पाश्चिमात्य शिक्षण पध्दतीशी घालण्याचा प्रयत्न करण्यात आला.***

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० चर्चा -

नवीन शैक्षणिक धोरणांचा ६६ पाणी मसुदा पुढील ४ महत्वाच्या विभागांमध्ये विभागला आहे.

(१) शालेय शिक्षण
(२) उच्च शिक्षण
(३) इतर महत्वाचे घटक
(४) धोरणाची अंमलबजवणी

२) शैक्षणिक धोरण – २०२० विशेष बाबी –

(१) आंतरविद्याशाखीय दृष्टीकोण –

या धोरणमध्ये आंतरविद्याशाखीय दृष्टीकोणावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यापीठात आणि महाविद्यालयात आता आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम चालववे लागतील. हा बदल खूप कौतूकास्पद म्हणावा लागेल. यापूर्वी खाजगी अभिमत विद्यापीठात स्वायत्तेमुळे असे आंतरविद्याशाखीय प्रयोग करता येत होते. परंतु राज्य आणि केंद्रीय विद्यापीठांना काही मर्यादा होत्या. संशोधन आणि रोजगारक्षम शिक्षणासाठी आंतरविद्याशाखीय पदवी महत्वपूर्ण भूमिका बजावतील. आता पदवी बहुशाखीय एकाच वेळी घेऊन पूर्ण केली जाणार आहे. विज्ञान व कला अशा वेगवेगळया शाखांतील विषय एकत्र घेवुन शिकता येईल.

(२) लवचिक दृष्टीकोण –

शैक्षणिक लवचिकता हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे महत्वाचे वैशिष्टये आहे. शालेय शिक्षणामध्ये नव्या अभ्यासक्रमाच्या सहाय्याने लहान बालकांची काळजी तर घेतली जाईलच त्याच बरोबर त्यांना वेगवेगळे सर्जनशील खेळ खेळण्यास दिले जातील. मुख्य म्हणजे "उच्च शिक्षणात आत घेण्याचे आणि बाहेर पडण्याचे" अनेक पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामुळे लवचिकता विद्यार्थ्यांना उपयोगी पडते. उच्च शिक्षणामध्ये शैक्षणिक पतपेढी / अकॅडमीक क्रेडीट बँक तयार करण्यात आली आहे.

(३) साक्षरता अभियान –

शाळेत जाणाऱ्या पण लिहीता वाचता न येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही खूप मोठी आहे. विविध सर्वेक्षणानुसार हा आकडा पाच कोटी पेक्षा मोठा आहे. हे चित्र बदलण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाने राष्ट्रीय अभियान हाती घेण्याचे निश्चित केले आहे. म्हणजेच शालेय शिक्षण हे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळेल.

(४) उच्च शिक्षण –

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० मध्ये उच्च शिक्षणाकडून मोठया अपेक्षा ठेवल्याचे दिसून येते. गुणवत्तेला प्राधान्य आणि स्वायत्तेवर भर दिला आहे. शिक्षणाची फेरमांडणी करण्यावर भर दिलेला आहे. जागतीक दर्जाच्या उच्च शिक्षणसंस्था निर्माण करण्यावर भर दिलेला आहे. उच्च शिक्षणाचे प्रवेश २०३० पर्यंत ५० टक्क्यापर्यंत वाढविण्यावर भर देण्यात आला आहे.

(५) विद्यापीठ स्तरावर बदल –

नवीन शैक्षणिक धोरणातील विद्यापीठाची स्वतंत्र नियमावली असणार नाही. देशातील सर्व विद्यापीठांना एकच नियम लागू होणार आहे. त्यामुळे देशात सगळीकडे एकच प्रकारची शिक्षण पध्दती असणार आहे. विद्यापीठात

वेगवेगळे शिक्षण देणारे विभाग असतील. एका विद्यापीठात ५ हजार विद्यार्थ्यांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येईल.

(६) महाविद्यालयीन स्तरावरील बदल –

नवीन शैक्षणिक धोरणानुसार केवळ नोकरीसाठी पदवी घ्यायची असेल तर त्याचा कालावधी तीन वर्षे असेल. त्यानंतर पूढे कोणाला संशोधन वा पदव्युत्तर शिक्षण घ्यायचे असेल त्याला आणखी एक वर्षे शिकावे लागेल. चार वर्षाची पदवी घेऊन पीएच.डी. ला प्रवेश त्या विद्यार्थ्यांला मिळेल. सध्याची उच्च शिक्षणाची पध्दत ही क्रेडीटबेस्ट असली तरी विद्यार्थी पदवी पूर्ण न करता पहील्या वर्षी किंवा दुसऱ्या वर्षी बाहेर पडल्यास त्याला कोणतेही प्रमाणपत्र मिळत नाही. परंतु नविन शिक्षण धोरणामुहे विद्यार्थी पदवी पूर्ण न करताच पहील्या किंवा दुसऱ्या वर्षी उत्तीर्ण होऊन बाहेर पडल्यास त्यांना प्रमाणपत्र किंवा पदवीकेचे प्रमाणपत्र दिल्या जाणार आहे.

(७) अकॅडमिक क्रेडीट बँक –

अकॅडमीक क्रेडीट बँक आता विद्यार्थ्यांकरीता असणार आहे. म्हणजे एखादा पदवी अभ्यासक्रम पूर्ण करतांना त्याला इतर कोर्स करून त्याचे क्रेडिट त्या विद्यार्थ्यांला मिळवायचे आहेत. आणि ते सर्व क्रेडीट मिळून एक पदवी दिली जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांला त्याच्या आवडीचे विषय निवडण्याची मूभा मिळेल. जगातील प्रगत विदयापीठामध्ये अशीच पध्दत आहे.

(८) उच्च शिक्षणातील रचनात्मक बदल –

राष्ट्रीय शौक्षणिक धोरण-२०२० ने भारताच्या प्रचलित सध्याच्या उच्च तर शिक्षण व्यवस्थेचे मूख्य प्रश्न नोंदविले आहेत. उच्च श्क्षिण व्यवस्थेचे अतिरिक्त विभाजन झाले आहे. ८०० विद्यापीठे व ४०,००० महाविद्यालये असून त्यापैकी ३० टक्के महाविद्यालयात विद्यार्थी संख्या १०० पेक्षा कमी आहे याची कारणे या धोरणाने नोंदविली आहेत.

१. मोठया आकारमानाच्या उच्च शिक्षण संस्थांना प्रोत्साहन देणे.

२. उच्च शिक्षण संस्थाना गुणवत्ता हा एकमेव निकष.

३. उच्च शिक्षण संस्थांना अधिक स्वायत्ता.

४. उच्च शिक्षण संस्थांना मूल्यमापनावर स्पर्धात्मक पध्दतीने वित्त पूरवठा.

५. अध्यापकांना अधिक स्वायत्तता व प्रगतीची संधी व गुणवत्ता निकषावर भरती.

६. कुलगुरूची चांगली नियुक्ती.

७. भारताच्या उच्च शिक्षण संस्थेचे वाढते आंतरराष्ट्रीयीकरण.

या धोरणात्मक ध्येयांच्या पूर्तीसाठी व्यावसायिक पातळीवर काही उपाय राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० ने सुचविलेली आहेत. त्यानूसार उच्च श्क्षिण संस्थांमध्ये शक्यतो विज्ञान, सामाजिक शास्त्रे, चित्रविज्ञान व कला मानव्यशास्त्रे यांचे एकत्रीकरण असेल.

(१) शिक्षकांचे शिक्षण –

नवीन धोरणात शिक्षकांचे शिक्षण याही महत्वाच्या मुदयाचा विचार करण्यात आला आहे. शिक्षण व्यवस्थेमध्ये महत्वपूर्ण भूमिका बजाविणारा शिक्षक हा भारतीय मूल्ये, भाषा, ज्ञान लोकरूढी, परंपरा, जनजातीच्या परंपरा याबाबतीत परिचित असावा अशी अपेक्षा करण्यात आली आहे. स्पर्धात्मक शिक्षण संवादांवर भर देणारी अध्यापनशैली, गुणवत्ता आधारित शिक्षण निवड त्यासाठी योग्य निकष आणि पारदर्शक प्रणालीसाठी शालेय शिक्षण गुणवत्ता निर्देशांक इ. आधार घेणे ही देखील नविन शैक्षणिक धोरणाची वैशिष्टये आहेत.

(२) व्यवसायीक / कौशल्य शिक्षणावर भर –

आजवर व्यवसाय शिक्षणाच्या अभ्यासक्रमाला दुय्यम स्थान दिले गेले आहे. सध्याच्या शिक्षण पध्दतीमध्ये पाठांतर, संस्थेची चालती व बाजारपणा बोलबाला आहे. कारण नौकरी योग्य कौशल्य प्राप्त शिक्षण नसल्याने बेरोजगारीला चालना मिळत आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने कौशल्य विकासाला दिलेले महत्व अशा उंचावणारे आहे. कौशल्य विकसीत करण्यासाठी खेळ, कृती, कोंडी, दैनंदीन जीवनाशी सांगड, शोधकवृत्ती, सौंदर्यदृष्टी आणि सर्जनशिलता वाढीला लागेल. अशा प्रकारच्या उपकरणाचा शिक्षण पध्दतीमध्ये वापर केला जाईल.

(३) शिक्षणामध्ये तंत्रज्ञान –

नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम शिकविण्याची पध्दत परिक्षाचे विकेंद्रीकरण, तासिका आणि परिक्षा विभाग यांच्यात अमुलाग्र बदल अपेक्षीत आहेत. शैक्षणिक संस्थामध्ये दृढनिश्चय, सहयोग आणि विश्वास गरजेचा आहे. आधुनिक युगात शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला आहे.

(४) भारतीय भाषांना प्रोत्साहन –

मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण घ्यावे असे देखील नवीन शैक्षणिक धोरण सुचविते. शालेय शिक्षणात मातृभाषेला प्राधान्य देण्यात आले आहे. मूलांना समजणारी भाषा असेल तर शिक्षण प्राप्त करणे सोपे आणि सहज शक्य होते. म्हणून पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण दिले जाईल.

(५) राष्ट्रीय शिक्षण आयोग –

सध्या उच्च शिक्षणातील विविध अभ्यासक्रमांसाठी वेगवेगळया नियामक संस्था कार्यरत आहेत त्याऐवजी नवीन धोरणानुसार एकच नियामक मंडळ असेल आणि राष्ट्रीय शिक्षण आयोग असे या नवीन नियामक मंडळाचे नांव असेल. देशाचे पंतप्रधान त्याचे अध्यक्ष असतील तर केंद्रीय शिक्षणमंत्री त्याचे उपाध्यक्ष असतील.

३) सूचनात्मक बाबी –

नवीन शैक्षणिक धोरणांच्या अंमलबजावणीमध्ये काही महत्वपूर्ण बाबींचा विचार होतो तसेच काही बाबतीत स्पष्टता होणे आवश्यक आहे.

१. सध्याचा शिक्षण हक्क कायदा हा ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र नव्या शैक्षणिक धोरणानुसार मूले आता तिसऱ्या वर्षात शाळेत येणार असून १८ व्या वर्षी बाहेर पडतील. त्यामूळे त्या कायदयामध्ये सुधारणा करुन त्यामध्ये शिक्षणाची व्याप्ती वाढवावी लागेल.
२. नवीन शैक्षणिक धोरणात मूलांच्या जडणघडणीत आणि शिक्षणाच्या प्रक्रियेत पालकांच्या तसेच समाजाच्या भूमिकेबद्दल काहीही भाष्य केलेले नाही.
३. प्राथमिक शाळा, माध्यमिक शळा आणि कनिष्ठ महाविद्यालये यांचे नविन आकृतीबंधानूसार विलनीकरणाचे धोरण कसे असेल हे अजून ही स्पष्ट नाही.
४. या धोरणातील घटक ७.२ मध्ये उल्लेख केल्या प्रमाणे देशातील एकुण प्राथमिक शाळेच्या २८ टक्के असलेल्या ३० पटाखालीत प्राथमिक शाळा हया बंद होतील. नवीन धोरणानुसार सरकार अनुदान केंद्र करेल असे अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत.
५. विद्यापीठ अनुदान आयोगासारख्या नियंत्रण करणाऱ्या संस्था बंद करून राष्ट्रीय शिक्षण आयोगाची स्थापना केली जाईल. परंतु ही संस्था स्वतंत्रपणे काम करेल.
६. नवीन धोरणात महीलांच्या शैक्षणिक विकासासाठी विशेष दखल घेतल्याचे दिसून येत नाही. तरी या संदर्भात काही प्रमाणात तरतूद करणे आवश्यक आहे.

निष्कर्ष –

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० हे शिक्षण व्यवस्थे मध्ये बदल सुचविणारे धोरण आहे. आंतरविद्याशाखीय दृष्टीकोण आणि धोरणातील लवचिकता शैक्षणिक क्षेत्रातील बदलामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावतील असे वाटते. नवीन धोरणामुळे शालेय आणि उच्च शिक्षण संदर्भात क्रांतीकारक स्वरूपाचे बदल घडवून येतील. नव्या शैक्षणिक धोरणानुसार पाठांतरा ऐवजी विद्यार्थ्यांची कल्पकता, सर्जनशिलता, कला-कौशल्य, प्रयोगशील उपक्रम यांना अधिक महत्व देण्यात आल्याने विद्यार्थ्यांचा शिक्षणाकडे कल वाढेल. शैक्षणिक गळती रोखणे शक्य होईल. असे असले तरी सरकारने या धोरणाची अंमलबजावणी करतांना विविध शिक्षण तज्ञांच्या सूचना घेणे आवश्यक वाटते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० काल सुसंगत आणि नव्या आव्हानांना कवेत घेणारे असून समाजासाठी उपयुक्त आहे.

संदर्भ सूची –

१) राष्ट्रीय नवीन शैक्षणिक धोरण आराखडा समितीच्या सदस्या – वसूधा कामत मूलाखत.

२) पाटील जे. एफ. – उच्च शिक्षणाच्या फेररचनेचे संकल्पचित्र – लोकसत्ता, १३ ऑगस्ट २०२०

३) पवार अभिमन्यु, शिक्षणातील नवा अध्याय, सकाळ १७ ऑगस्ट २०२०

४) www.national educationpolicy2020.com

५) www.national education policy, 2020 draft.